शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०७/२०१८

| | |
|---|---|
| प्रा.डॉ.सौ. सुगंधा हिंदूराव घरपणकर | तक्रार अर्जदार |
| विरूध्द् | |
| १. सेनापती प्रतापराव गुजर शिक्षण संस्था, कानडेवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.<br>२. राजा शिवछत्रपती कला आणि वाणिज्य महाविद्यालय, महागांव, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर. | वि. प |

सेनापती प्रतापराव गुजर शिक्षण संस्था, कानडेवाडी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांचे राजा शिवछत्रपती कला आणि वाणिज्य महाविद्यालय, महागांव, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर या महाविद्यालयाकडील शिक्षिका प्रा.डॉ.सौ. सुगंधा हिंदूराव घरपणकर यांनी दि.०९/०१/२०१५ रोजीचा तक्रार अर्ज समितीकडे दाखल केला आहे. तक्रार अर्जात नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी प्रा.डॉ.सौ.श्रीमती सुगंधा हिंदूराव घरपणकर (विषय हिंदी) माझे डिसेंबर पेड जानेवारी २०१५ चे वेतनातून कपात होत आहे. याबाबतचे माझे सविस्तर म्हणणे असे:-

मी, दि. ०२/०७/१९९५ पासून राजा शिवछत्रपती कला व वाणिज्य महाविद्यालय विद्यापीठ निवड समितीमार्फत रितसर नेमणूक होऊन हिंदी विषयाकरिता सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे. मला कार्यभार कमी झालेने व सेट/नेट परिक्षा उत्तीर्ण नसलेने दि.१९/०६/१९९९ पासून कमी करण्यात आले, त्या विरोधात मी पुणे ट्रॅब्युनल व मुंबई हायकोर्टात दाद (न्याय) मागितली होती. परंतु हायकोर्टाच्या मिनिटस् ऑफ ऑर्डरने मी दि. २४/१०/२००२ रोजी केस मागे घेतली व कार्यभार उपलब्ध झालेने मी पुन्हा २३/०६/२००३ रोजी महाविद्यालयात पूर्वपदावर हजर झाले. तशी

पुर्ननियुक्ती शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी दिली आहे व आजअखेर मी या पदावर कार्यरत आहे.

तत्कालीन काळात जून १९९७ ते ऑक्टोंबर १९९८ या कालावधीतील वेतन वसुलीची महाविद्यलयीन प्रशासनाकडून पत्रे दिली आहेत. त्या पत्रांना वेळोवेळी उत्तरेही दिलेली आहेत. जून १९९७ ते १९९८ या काळात प्रा. महादेव दुंडाप्पा माने (राज्यशास्त्र) हे प्रभारी प्राचार्य म्हणून कार्यरत होते. या काळात मी ही कार्यरत होते. तसेच मला १९/०६/१९९९ रोजी संस्थेने कार्यभार नसलेने पदमुक्त केले. परंतु तत्कालीन प्रभारी प्राचार्य/संस्था प्रशासनाने मला कार्यभार कमी अथवा पद अमान्य झालेले आहे असे लेखी पत्राने अगर तोंडी कळविलेले नाही. उलट मला अचानक १९/०६/१९९९ ला कार्यभार कमी झालेने पदमुक्त केलेचे पत्र दिले. तथापी, मी जून १९९७ ते ऑक्टोंबर १९९८ या काळात मी सेवेत कार्यरत होते. त्यामुळे मला तत्कालीन वेतन मिळणे क्रमप्राप्तच ठरते.

दि. १८/१०/२०१३ रोजी तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे तत्कालीन प्रभारी प्राचार्य प्रा. महादेव दुंडाप्पा माने (राज्यशास्त्र) यांनी आपल्या वेतन कपातीबाबत व इतर समस्यांबाबत तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे अर्ज केला होता. तक्रार निवारण समितीने मला किंवा इतर सहकाऱ्यांना याबाबत कोणत्याही प्रकारे लेखी विचारणा न करता तत्कालीन वेतन वसुलीचे पत्र महाविद्यालयीन प्रशासनाला पाठविले आहे. याबाबत मी तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेकडे दि. ०९/०७/२०१४ रोजी पत्रव्यवहार केला होता व त्यामध्ये आपल्या समितीचा ठराव हा एकांगी स्वरूपाचा आहे असे म्हटले होते. परंतु त्यांनी वस्तुस्थिती विचारात न घेता २२/०७/२०१४ चे पत्राने माझी विनंती अमान्य केली आहे असे कळविले आहे. परंतु आता मी रितसर आपणांकडे अर्ज करून कळवू इच्छितो की, या संदर्भातील सविस्तर माहिती व कागदपत्रे तपासून या प्रकरणाची संपूर्ण चौकशी व्हावी.

तत्कालीन प्रभारी प्राचार्य प्रा. महादेव दुंडाप्पा माने (राज्यशास्त्र) यांची २८ ऑगस्ट २००४ रोजी शिवाजी विद्यापीठ चौकशी कमिटी/समितीची बैठक झाली आहे. व त्यावर महाविद्यालयाने २९/११/२००५ चा श्री. महादेव दुंडाप्पा माने प्रभारी प्राचार्य यांच्या चौकशीचा अहवाल पाठविला असून त्यावर शिवाजी विद्यापीठाने २७ डिसेंबर २००५ चा आय/टे/प्राचार्य/१४४/१०५९१ चे पत्रानुसार संस्थेच्या अधिकारत श्री. एम. डी. माने यांच्यावर स्टॅटयूट २१७ (A) II (a) नुसार कारवाई करण्याबाबत मान्यता दिली होती.

वरील संपूर्ण तपशिल व मी जोडलेली कागदपत्रे पाहता, माझे वरील/ तत्कालीन वेतन वसुलीचा मुद्दा गौण ठरतो. तसेच तत्कालीन प्रभारी प्राचार्य महादेव दुंडाप्पा माने यांनी तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठाकडे केलेल्या अर्जानुसार तक्रार निवारण समितीने घेतलेल्या निर्णयाचा पुनर्रविचार करावा. समितीने घेतलेला एकांगी निर्णय मला मान्य नाही उलट माझे महाविद्यालयीन ४ वर्षे ३ दिवस गेलेल्या सेवेला सर्वस्वी तत्कालीन प्रभारी प्राचार्य प्रा. महादेव दुंडाप्पा माने व संस्था प्रशासन हेच जबाबदार असल्याने माझे या कालावधीत झालेले आर्थिक, मानसिक नुकसान भरपाई यांचेकडे का मागू नये? असा प्रश्न निर्माण होतो. म्हणून या प्रकरणाची रितसर चौकशी, कागदपत्रे पहावीत व मला म्हणणे मांडण्याची संधी मिळावी व मला माझे पुढील जीवन जगण्यासाठी न्याय मिळावा.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

श्री. माने हे सन १९९७—९८ साली प्रभारी प्राचार्य म्हणून कार्यरत होते. मा. शिक्षण सहसंचालकसो, कोल्हापूर यांच्या दि.०१/१०/१९९७ च्या पदमान्यतेनुसार प्रा.आवळे, प्रा.कांबळे, प्रा.मोंगले व प्रा. श्रीमती पोवार यांचा कार्यभार पुरेशा विद्यार्थी संख्येअभावी अमान्य केलेला होता. तरीसुध्दा प्रभारी प्राचार्य श्री. माने यांनी वरील कर्मचाऱ्यांचा पगार दि.२७/१२/१९९७ रोजी सदर कर्मचारी अथवा संस्थेला कोणतीही पुर्वसूचना न देता बेकायदेशीरपणे केलेला आहे. तद्नंतर संस्थेने अमान्य पदाच्या कर्मचाऱ्यांना आगाऊ नोटीसा देवून सेवेतून कमी केले होते. त्यानंतर सदर कर्मचारी हे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कार्यभार उपलब्ध झाल्यावर कामावर पुनश्चः रूजू झालेले आहेत.

सदर कालावधीमध्ये श्री.माने यांनी केलेले कामकाज व महाविद्यालयाचे झालेले आर्थिक नुकसान यासंदर्भात संस्थेचे जा.क्र. २७/२००३-०४, दि. १७/०२/२००४ ने श्री. माने यांची विधिनियम २१७ (अ)/ II (a) नुसार विद्यापीठाकडे चौकशी समितीची मागणी केली. त्यानुसार विद्यापीठाने आपले जा.क्र. आय/टे.१/प्राचार्य/१४४/१३१७९, दि. २३/०४/२००४ ने चौकशी समिति नियुक्ती केली. सदर चौकशी समितीने दि. २८/०८/२००४ रोजी श्री. माने यांची चौकशी करून त्याबाबतचा आपला स्वयंस्पष्ट अहवाल विद्यापीठास सादर केला. त्यास विद्यापीठाने आपले जा. क्र. आय/टे.१/प्राचार्य/१४४/१०५९१, दि. २३/१२/२००५ च्या पत्राने संस्थेच्या अधिकारात श्री. माने यांच्यावर विधिनियम २१७ (अ)/ II(a) नुसार योग्य ती कारवाई करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संस्थेने श्री. माने यांच्या मासिक वेतनातून पगार कपात करणेबाबत महाविद्यालयास आदेश दिलेले होते. त्यानंतर श्री. माने यांचे वेतनातून महाविद्यालयाने वसूली सुरू केलेली होती.

परंतू आपले जा.क्र. एसयु/ॲफि/टे.१/प्राचार्य/आरव्हीसी/३६७६, दि. २१/०६/२०१४ च्या निर्णयानुसार अमान्य कर्मचाऱ्यांच्या माहे डिसेंबर २०१४ च्या वेतनातून कपात सुरू केलेली आहे.

**संस्थेचा अभिप्राय :**

संस्थेने प्रा.डॉ.घरपणकर एस.एच. यांची दि. ०१/०७/१९९५ रोजी विद्यापीठ निवड समितीमार्फत NB III-D या अटीस अधीन राहून तदर्थ म्हणून नियुक्ती केलेली आहे. संस्थेने सन १९९७-९८ साली प्रभारी प्राचार्य म्हणून प्रा.माने यांची जा.क्र.१४५/८/९७-९८, दि.२७/११/१९९८ रोजीच्या पत्राने निवड केलेली होती. त्यास विद्यापीठाने अफि/टे. १/प्राचार्य/११६४८, दि. १२/१२/१९९७ रोजीच्या पत्राने मान्यता दिली होती. त्यावेळी प्र.प्राचार्य श्री. एम.डी.माने यांनी माहे जुलै १९९७ ते डिसेंबर १९९७ चे वेतनाचे चेक व दि. ०१/१०/१९९७ च्या विद्यार्थी संख्येनुसारचे पदमान्यतेचे पत्र मा. शिक्षण सहसंचालकसो, कोल्हापूर यांचेकडून स्वतः आणले. दि. ०१/१०/१९९७ च्या विद्यार्थी संख्येनुसारचे पदमान्यतेचे पत्रनुसार प्रा. एस.डी.आवळे, प्रा. ए.डी.कांबळे, प्रा. आर.जी.मोंगले व प्रा. श्रीमती एस.बी.पोवार हे तदर्थ म्हणून कार्यरत असलेले कर्मचारी यांचा कार्यभार पुरेशा विद्यार्थी संख्येअभावी अमान्य केलेला होता. सदर पदमान्यता पत्राचा अभ्यास न करताच किंवा त्यासंदर्भात सदर कर्मचारी अथवा संस्थेला कोणतीही पूर्वसूचना न देता बेकायदेशीरपणे श्री.माने यांनी जाणुनबुजून हेतुपुरस्पर दि.२६/१२/१९९७ रोजी सर्वच मान्य व अमान्य पदांचे वेतन केलेले आहे. तसेच हे बेकायदा वेतन त्यांनी सदर अमान्य पदांना माहे जून १९९८ पर्यंतअदा केलेले आहे व तदनंतर त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दि. ०३/०७/१९९८ रोजी दिला. सदर घटना महाविद्यालय व संस्थेस सन १९९८-९९ मधील प्र.प्राचार्य श्री. एन.आर.पाटील यांना माहे ऑक्टो. १९९८ मध्ये तत्कालीन प्रशासन अधिकारी श्री. ए.डी.पाटील यांनी निदर्शनास आणून दिली व ही बाब प्र.प्राचार्य श्री.पाटील यांनी संस्थेच्या निदर्शनास आणून दिली. त्यानंतर महाविद्यालयास माहे नोव्हेंबर १९९८ ते फेब्रुवारी १९९९ पर्यंतचे वेतन अनुदान प्राप्त झालेले नाही व पर्यायाने मान्य कार्यरत पदांना माहे नोव्हेंबर १९९८ ते फेब्रुवारी १९९९ या कालावधीतील वेतन देता आलेले नाही. तदनंतर संस्थेने अमान्य पदावरील कर्मचा-यांना आगाऊ नोटीसा देवून जून १९९९ पासून सेवेतून कमी केले होते. त्यानंतर सदर कर्मचा-यांनी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका दाखल केली होती. त्याचा निकाल दि. २४ ऑक्टोबर, २००२ रोजी लागला. त्या आदेशानुसार सदर कर्मचारी कार्यभार उपलब्ध झाल्यावर पुनश्चः रूजू झालेले आहेत.

सदर कालावधीमध्ये श्री.माने यांनी केलेले कामकाज व महाविद्यालयाचे झालेले आर्थिक नुकसान यासदंर्भात संस्थेचे जा.क्र.२७/२००३-०४, दि. १७/०२/२००४ ने श्री. माने यांची विधिनियम २१७ (अ)/II (a) नुसार विद्यापीठाकडे चौकशी समितीची मागणी केली. त्यानुसार विद्यापीठाने आपले जा.क्र. आय/टे.१/प्राचार्य/१४४/१३१७९, दि. २३/०४/२००४ ने चौकशी समिती नियुक्त केली. सदर चौकशी समितीने दि. २८/०८/२००४ रोजी श्री.माने यांची चौकशी करून त्याबाबतचा आपला स्वयंस्पष्ट अहवाल विद्यापीठास सादर केला. त्यास विद्यापीठाने आपले जा. क्र. आय/टे.१/प्राचार्य/१४४/१०५९१, दि. २३/१२/२००५ च्या पत्राने संस्थेच्या अधिकारात श्री.माने यांच्यावर विधिनियम २१७ (अ)/ II(a) नुसार योग्य ती कारवाई करणेस मान्यता दिलेली आहे. त्यानुसार संस्थेने श्री.माने यांच्या मासिक वेतनातून पगार कपात करणेबाबत महाविद्यालयास आदेश दिलेले होते. त्यानंतर श्री.माने यांचे वेतनातून महाविद्यालयाने वसूली सुरू केलेली होती. परंतू आपले जा.क्र एसयु/ॲफि/टे.१/प्राचार्य/आरव्हीसी/३६७६, दि. २१/०६/२०१४ च्या निर्णयानुसार अमान्य कर्मचा-यांच्या माहे डिसेंबर २०१४ च्या वेतनातून कपात सुरू केलेली आहे.

**समितीची निरिक्षणे :**

तक्रारदार यांनी संस्थेने माहे डिसेंबर २०१४ (पेड इन जानेवारी २०१५) च्या पगारातून वसुली सुरू केल्याची तक्रार समितीकडे दाखल केली आहे. तक्रारदार यांनी समितीसमोर संस्थेने आपले म्हणणे ऐकूण न घेता आपल्या वेतनातून रक्कमेची वसुली सुरू केल्याचे कथन केले. या प्रकरणाच्या सुनावणी दरम्यान संस्था व महाविद्यालयास समितीसमोर आपली बाजू मांडण्यास अनेकवेळा संधी देण्यात आली. तथापी संस्था व महाविद्यालय प्रतिनिधी सुनावणीस अनुपस्थित राहीले नाहीत व त्यांनी त्यांची बाजू कोणत्याही प्रकारे समितीसमोर मांडली नाही. संस्था व महाविद्यालय हे समितीसमोर बाजू मांडणेस हजर राहत नसतील तर तक्रारदार यांच्या वेतनातून रक्कमेची वसूली सुरूच राहील तेंव्हा ती त्वरीत थांबविणेत यावी तसेच संस्था व महाविद्यालयाकडून या प्रकरणी बाजू मांडल्यानंतर पुढील कार्यवाही करावी अशी विनंती तक्रारदार यांनी समितीस केली. समितीने तक्रारदार यांची विनंती लक्षात घेवून तसेच संस्था व महाविद्यालय हे समितीसमोर उपस्थित राहत नसल्याने तक्रारदार यांच्या वेतनातून करण्यात येणा-या वसूलीबाबत संस्थेस दि.१५/०५/२०१८ रोजी स्थगिती आदेश दिलेला होता. दरम्यान कोरोना महामारीच्या अनुषंगाने सदर प्रकरणावरील पुढील सुनावणी समितीस घेता आली नाही. कोव्हीड कालावधी नंतर या प्रकरणावरील सुनावणी समितीकडून घेण्यात आली. सदर सुनावणीस तक्रारदार, संस्था व महाविद्यालय तसेच तत्कालीन प्राचार्य श्री. महादेव माने

यांना लेखी नोटीसीव्द्वारे बोलावण्यात आले. तथापी समितीसमोर संस्था व महाविद्यालय हे गैरहजर राहीले.

तक्रारदार यांनी समितीसमोर केलेल्या कथनाच्या अनुषंगाने श्री. महादेव माने यांनी समितीसमोर तत्कालीन परिस्थितीत महाविद्यालयातील वर्कलोड कमी झाल्याच्या कारणावरून मा. सहसंचालक यांनी विद्यार्थी संख्येची अट लक्षात घेऊन त्यावेळी तक्रारदार शिक्षकांचे वेतन अमान्य केले. त्यावेळेस कमी वर्कलोड असताना सुध्दा या शिक्षकांचे वेतन अदा केले गेले होते. त्यावेळेस मी त्या संबंधित शिक्षकांचे वेतन का अदा केले म्हणून संस्थेने माझे १८ महिन्याचे वेतन अदा केले नाही. आपण याबाबत त्यावेळी तक्रार निवारण समितीकडे दाद मागीतल्यानंतर समितीने थकीत १८ महिन्याचे वेतन अदा करण्याचे आदेश पारित केल्यानंतर संस्थेकडून देण्यात आल्याचे कथन केले.

तक्रारदार यांनी समितीसमोर आपण तक्रार दाखल केल्यानंतर समितीचा स्थगिती आदेश मिळेपर्यंत संस्थेने आपल्या वेतनातून वसुलीपोटी सर्व रक्कमेची वसूली केली असल्याची माहिती समितीसमोर मांडली. तत्कालीन प्रभारी प्राचार्य श्री.एम.डी.माने यांच्याकडे त्यावेळी प्रभारी प्राचार्य पदाचा कार्यभार होता. विद्यार्थी संख्या कमी झाली म्हणून शासनाकडून त्या काळातील वेतन अमान्य केले गेले असल्याचे संस्थेकडून तक्रारदार यांना कळाले. संस्थेने आपल्या वेतनातून वसूली केली. वेतनातून वसूल केलेली रक्कम परत मिळावी. तसेच आपण जून ११९७ ते ऑक्टोंबर १९९८ या काळात महाविद्यालयात कार्यरत होतो असे कथन केले.

या प्रकरणी सर्व बाजू ऐकूण घेता समितीचे मत असे की, सदर महाविद्यालयाचे तत्कालीन प्राचार्य श्री.एम.डी.माने यांनी त्यांचे वेतन कपातीबाबत व इतर समस्यांबाबत २०१३ साली तक्रार निवारण समितीकडे अर्ज केला होता. तसेच तक्रारदार यांनी सदर कालावधीत महाविद्यालयात काम केले नसल्याचे संस्था व महाविद्यालयाने नाकारलेले नाही. शिक्षकांनी महाविद्यालयात काम केलेले असेल तर त्यांना त्या कालावधीतील वेतन मिळणे हे क्रमप्राप्त आहे. या प्रकरणी समितीसमोर सुनावणीस उपस्थित राहून संस्था व महाविद्यालयाकडून याबाबी स्पष्टता करणे आवश्यक होते. सबब समितीसमोर तक्रारदार व प्रा. महादेव माने यांनी कथन केलेले म्हणणे ग्राहय् धरून समिती या निष्कर्षास येते की, तत्कालीन प्रा. महादेव माने यांचे कथनानुसार तक्रारदार यांनी त्यावेळीस सेवेत राहून त्यांचे कार्य केले आहे. वेतन अमान्य झाले असले तरी विद्यापीठ मान्यता असणा-या कार्यरत शिक्षक यांना त्यांनी केलेल्या कार्याचा मोबदला देणे ही संस्थेची नैतीक जबाबदारी आहे. सबब समिती खालील आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

तक्रारदार यांचे वेतनातून डिसेंबर २०१४ (पेड जानेवारी २०१५) पासून पुढील कालावधीत वसुलीपोटी जी रक्कम कपात करण्यात आली होती ती सर्व रक्कम संस्था व महाविद्यालय यांनी आदेश प्राप्त झालेपासून दोन महिन्याच्या आत तक्रारदार यांना अदा करावी.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.

शिवाजी विद्यापीठ तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

दिनांक : 18 AUG 2022

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(डॉ. एन.बी.गायकवाड)

सदस्य
(श्री.ए.ए.कुलकर्णी)

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन )

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए. कदम)

अध्यक्ष
(श्री. एस.पी.कुलकर्णी)